श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिका जि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि. अहिल्यानगर, यांचे गैरवर्तनाबाबत पदावरुन तात्पुरत्या स्वरुपात दूर करणे बाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथमिक)
आदेश क्र.कार्या-२/खाचौ/४३८/२०२५
अहिल्यानगर दि.१९/०८/२०२५

ज्याअर्थी श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिका, जि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर येथे कार्यरत असताना सदर शाळेतील शिक्षक श्री.संजय उत्तम फुंदे, उपाध्यापक यांनी शालेय विद्यार्थीनीशी गंभीर स्वरुपाचे अश्लिल गैरवर्तन केलेले आहे. प्रकरणी गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती पाथर्डी यांनी केलेल्या चौकशीचे वेळी श्रीम.शिला भगवान बांगर यांनी कुठलेही प्रकारची शहानिशा न करता दि.०६/०८/२०२५ रोजी दिलेल्या जबाबात तफावत आढळून येत असून जबाब संदिग्ध स्वरुपाचा व प्रशासनाची दिशाभूल करणारा आहे.सदर प्रकरणी श्रीम.शिला भगवान बांगर,प्राथ.शिक्षक तथा प्रभारी मुख्या.जि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी यांनी मुख्याध्यापक पदाचे कर्तव्यात कसुर करणे, प्रशासनाची दिशाभूल करणे आदी प्रकरणी त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा ३ भंग केला आहे. त्यानुसार त्यांचे विरुध्द शिस्तभंग कारवाई करण्याचे योजिले आहे.

त्याअर्थी मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर मला महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग २ मधील नियम ३ (१) (अ) अन्वये मला प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन याव्दारे उक्त श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिकाजि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर यांना आदेशान्वये जिल्हा परिषद सेवेतून निलंबित करीत आहे.

आणखी असाही आदेश देत आहे की हा आदेश अंमलात राहिल तेवढया कालावधीत श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिका, जि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर यांचे मुख्यालय पंचायत समिती...शेवगाव...............येथे राहिल आणि उक्त श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिकाजि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर यांना गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती शेवगाव...........यांच्या पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिका जि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयेत्तर सेवा

आणि निलबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतुदीनुसार निलंबन भत्ता देण्यात यावेत.

निलंबनाच्या कालावधीत श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिका जि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये,त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांच्यावर ठेवण्यात,तसेच ते निलबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.निलंबनाच्या कालावधीत निलंबन निर्वाह भत्ता जेव्हा जेव्हा देण्यात येईल,त्यावेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही खाजगी धंदा वा व्यवसाय करीत नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिका जि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर यांना सादर करावे लागेल.

निलंबनाच्या कालावधीत श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिका जि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती.........शेवगाव......... जि.अहिल्यानगर हे करतील.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.20250819160085 असा आहे.

(आनंद भंडारी,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम.शिला भगवान बांगर, प्राथ.शिक्षक तथा प्र.मुख्याध्यापिका जि.प.प्राथ.शाळा पागोरी पिंपळगाव ता.पाथर्डी जि.अहिल्यानगर

प्रत व द्वारा :-गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती पाथर्डी, ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर

२/-सदरचा आदेश संबंधितास बजावून दुस-या प्रतिवर प्रत मिळाले बाबतची दिनांकित स्वाक्षरी घ्यावी व पोहच त्वरीत इकडेस सादर करावी.

प्रत:-गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती ...शेवगाव........... जिल्हा अहिल्यानगर

स्वाक्षरी/-

(आनंद भंडारी,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर